


दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे




वर्ष ६ । अंक २९ । सोमवार १९ ऑक्टोबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322



सोमवंशी क्षत्रिय कासार समाज,
श्री कालिका देवी, अहिल्यानगर
माळ आठवी वाहन : उंट
मूर्तीकार : श्री धनंजय वेळापुरे.
छाया : विशाल येंडे.

## सुट्टीची सूचना

विजयादशमी (दसरा) निमित्त 'दैनिक आकर्षण' कार्यालयास मंगळवार दि. २० ऑक्टोबर २०२६ रोजी सुट्टी असल्याने या दिवशीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी नोंद घ्यावी.

**विजयादशमी (दसरा) निमित्त हार्दिक शुभेच्छा!**

- संपादक

### टाकळी ढोकेश्वर व खडकवाडी शिवारात

# वाळूतस्करांवर एलसीबीची धडक कारवाई

### पाच आरोपींना बेड्या, एक कोटी १६ लाखांचा मुद्देमाल जप्त



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने पारनेर तालुक्यात धडक कारवाई करत वाळू तस्करीचा मोठा डाव उधळून लावला आहे. टाकळी ढोकेश्वर ते पारनेर रस्ता आणि खडकवाडी शिवारात केलेल्या दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये पोलिसांनी ३ डंपर, २ जेसीबी आणि १ ट्रॅक्टर असा एकूण १ कोटी १६ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी ५ आरोपींना बेड्या ठोकण्यात आल्या असून इतर फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

दिनांक १९ ऑक्टोबर रोजी टाकळी ढोकेश्वर ते पारनेर जाणाऱ्या रस्त्यावर डंपरमधून वाळूची चोरून वाहतूक होत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. या माहितीच्या आधारे पथकाने सापळा रचून तीन डंपर पकडले. डंपरमध्ये वाळू मिळून आल्याने डंपर व वाळू असा ६० लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी ३ जणांना ताब्यात घेण्यात आले असून २ जण फरार आहेत. त्यांच्यावर पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसरी कारवाई खडकवाडी ■ पान ४ वर

**कारवाई करणारे तपास पथक**

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, पोलीस उपनिरीक्षक विकास जाधव आणि अंमलदार योगेश भिंगारदिवे, शाहीद शेख, पंकज व्यवहारे, अमोल आजबे, अतुल लोटके, विष्णू भागवत, अशोक लिपणे, रोहित येमुल यांच्या धडक तपास पथकाने ही कारवाई केली.

**जप्त केलेला मुद्देमाल**

पोलिसांनी दोन्ही कारवायांमध्ये एकूण ३ वाळूचे डंपर, २ जेसीबी, १ ट्रॅक्टर (ट्रॉलीसह) आणि वाळू असा तब्बल एक कोटी १६ लाख ९५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**५ आरोपी अटकेत, ६ फरार**

या मोठ्या कारवाईत पोलिसांनी अक्षय जेडगुळे, गोरख मधे, ऋतीक टोपले (सर्व रा. वासुंदे), योगेश उघडे (रा. वनकुटे) आणि ओंकार गोर्डे (रा. टाकळी ढोकेश्वर) या ५ जणांना रंगेहाथ पकडले आहे. तर प्रशांत वाळुंज, चैतन्य डुमरे, ओंकार बोरुडे, सुधीर शिंगोटे, अमोल आल्हाट आणि रोहित साळवे या ६ फरार आरोपींचा पोलिसांकडून शोध सुरू आहे.

# मंदिराचे काम पूर्ण करण्यासाठी प्रत्येकाने सहकार्य करावे - आमदार संग्राम जगताप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सकल ब्राह्मण समाज महासंघाच्या वतीने उभारण्यात येत असलेल्या भगवान श्री परशुराम मंदिराच्या कळसाच्या स्लॅबचे भरणी आमदार संग्रामभैय्या जगताप यांच्या हस्ते करण्यात आली. मंदिराचे काम पूर्णत्वास नेण्यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीने योगदान द्यावे, असे आवाहन यावेळी आमदार जगताप यांनी केले.

आमदार संग्रामभैय्या जगताप म्हणाले, भगवान श्री परशुराम मंदिर सर्वांसाठी खुले असून, मंदिराचे काम पूर्ण करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. मंदिराचे काम कळसापर्यंत पूर्णत्वास नेण्यासाठी प्रत्येकाने आपल्या परीने मदत करावी. देणगीदारांच्या सहकार्यामुळे मंदिराचे काम पुढे जात असून, हे काम करताना कोणताही अडथळा निर्माण होणार नाही, याची काळजी घेतली जाईल. मंदिराच्या कामावर बारकाईने लक्ष ठेवून आवश्यक त्या बाबींचे निरीक्षण केले जाईल, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी संपत बारस्कर यांनी मंदिराच्या उर्वरित कामासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. पत्रकार विठ्ठल लांडगे यांनी मनोगत व्यक्त करताना, समाजात मतभेद असणे स्वाभाविक असले, तरी मनभेद होऊ देऊ नयेत. समाजाच्या एकजुटीतूनच मंदिराचे काम यशस्वीरीत्या पूर्ण होईल, असे मत व्यक्त केले.

याप्रसंगी सकल ब्राह्मण समाज सेवा संस्थाचे अध्यक्ष राजाभाऊ पोतदार, उपाध्यक्ष नंदकुमार पोळ, प्रमोद कुलकर्णी, विजय देशपांडे, सचिव योगेश दाणी, सहसचिव मोरेश्वर मुळे,कोषाध्यक्ष हेमंत लोहगावकर, ह.भ.प. प्रभा भोंग, सुवर्णा महापुरुष, किरण वैकर , चेतन , अमोल वैद्य ,माजी महापौर बाबासाहेब वाकळे, नगरसेवक करन कराळे, मनोज दुल्लम, संपत बारस्कर, पुष्कर कुलकर्णी, पत्रकार विठ्ठल लांडगे, सुरेश बनसोडे, डॉ. सागर बोरुडे आणि अनिल बोरुडे आदीसह सर्व ब्राह्मण संघाचे पदाधिकारी उपस्थित होते. सूत्र संचलन दिपाली उदास यांनी केले.आभार योगेश दाणी यांनी मानले.

# जिथे स्वातंत्र्यानंतर एसटी पोहोचली नव्हती, तिथे अखेर लालपरी धावली!

### आमदार काशिनाथ दाते यांच्या पाठपुराव्याला यश; खामकर झापमध्ये स्वातंत्र्यानंतर प्रथमच एसटी बस, ग्रामस्थांमध्ये समाधान



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील खामकर झाप आणि वडगाव सावताळ परिसरातील ग्रामस्थांची अनेक दिवसांची मागणी अखेर पूर्ण झाली आहे. पारनेर आगाराच्या वतीने पारनेरटाकळी ढोकेश्वरखामकर झापमार्गे वडगाव सावताळ या नवीन एसटी बसफेरीचा शुभारंभ शनिवार, दि. १७ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी नऊ वाजता उत्साहात करण्यात आला. विशेष म्हणजे, ही बसफेरी सोमवारी सुरू होणार असताना शनिवारीच प्रत्यक्ष धावल्याने परिसरात समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

युवा नेते डॉ. प्रदीप काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते या बससेवेचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी खरेदी-विक्री संघाचे माजी चेअरमन ॲड. बाबासाहेब खिलारी आणि पारनेर आगार व्यवस्थापक अमोल कोतकर यांची प्रमुख उपस्थिती होती.या शुभारंभप्रसंगी ज्येष्ठ नेते बी. टी. खामकर सर, माजी सरपंच राजेंद्र रोकडे, युवा नेते नंदकिशोर खामकर,स्वीय सहाय्यक अशोक आहेर, चेअरमन शिवाजी रोकडे, भाजप नेते संकल्प शिंदे, विठ्ठल बर्डे, शिवाजी जाधव दीपक साळवे, दत्तात्रय खामकर, प्रशांत निवडुंगे, भरत खामकर, कैलास खामकर, रमेश ठाणगे, सुनील खामकर, किरण खामकर, तुषार निवडुंगे, बाळासाहेब ठाणगे, केतन ठाणगे, हनुमंत ठाणगे, कोंडीभाऊ निवडुंगे गुरुजी, अशोक झावरे, ज्ञानदेव खामकर, संदीप ठाणगे, तुषार खामकर, मंगेश खामकर, मंजाबा खामकर, विलास खामकर, ■ पान ४ वर

आमदार काशिनाथ दाते यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ. प्रदीप दाते यांच्या पाठपुराव्याने ग्रामस्थांच्या मागणीनुसार खामकर झाप मार्गे वडगाव सावताळला स्वातंत्र्यानंतर प्रथमच एसटी बस धावली त्यामुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे व यापुढील काळातही आमदार दाते हे वडगाव सावताळ मध्ये विकास कामे करण्यासाठी कटिबद्ध आहेत.

**नंदकिशोर खामकर**
(युवा नेते, वडगाव सावताळ)

खामकर झापमार्गे वडगाव सावताळ बससेवा आमदार काशिनाथ सर यांच्या पाठपुराव्याने सुरू झाल्यामुळे परिसरातील ग्रामस्थ, विद्यार्थी आणि नागरिकांची प्रवासाची गैरसोय दूर होण्यास मदत होणार आहे. ग्रामीण भागातील दळणवळण मजबूत होणे ही काळाची गरज आहे. नागरिकांच्या सोयीसाठी ही बसफेरी नियमित सुरू राहावी, यासाठी संबंधित यंत्रणेने सहकार्य करावे. या बससेवेचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा.

**डॉ. प्रदीप दाते** (युवा नेते)

# श्रीगोंदा व कर्जत तालुक्यात धुमाकूळ घालणारी चोरट्यांचा छडा

### स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेची कारवाई, पाच गुन्हे उघडकीस

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–**श्रीगोंदा आणि कर्जत तालुक्यात घरफोडी व चोऱ्या करून धुमाकूळ घालणाऱ्या टोळीच्या मुसक्या आवळण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. मुख्य आरोपीसह चोरीचे दागिने खरेदी करणाऱ्या आणि जवळ बाळगणाऱ्या तिघांना अटक करण्यात आली असून, एकूण ५ गुन्हे उघडकीस आले आहेत.

श्रीगोंदा येथील मांडवगण रोडवरील आळेकर मळा येथे २७ ऑगस्ट रोजी नितीन रोही यांच्या घरी अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून सोने व रोख रक्कम चोरून नेली होती. याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता. अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी हे गुन्हे ■ पान ४ वर




**चोरीचे दागिने घेणाराही अटकेत**

चोरीतील सोन्याचे काही दागिने पत्नी अजाला योगेश काळे (वय २४) हिला दिले असून, काही दागिने सलबतपूर (ता. नेवासा) येथील दीपक सुभाष कपिले याला विकल्याचे आरोपीने पोलिसांना सांगितले. या माहितीवरून पोलिसांनी तातडीने शोध घेत अजाला काळे व दीपक कपिले या दोघांनाही ताब्यात घेतले. त्यांच्याकडून २७ हजार ५०० रुपये किमतीचे १ ग्रॅम ८२० मिलीग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

# रायगव्हाणच्या भवानी मातेच्या दर्शनासाठी भाविकांची मांदियाळी!

### सातव्या माळेला हजारो भाविकांनी घेतले जगदंबा मातेचे दर्शन; मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण



**दैनिक आकर्षण । केशव कातोरे**

**बेलवंडी–** श्रीगोंदा तालुक्यातील रायगव्हाण येथील जागृत देवस्थान आणि नवसाला पावणारी आई जगदंबा तथा तुळजाभवानी मातेच्या शारदीय नवरात्रोत्सवाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. शनिवार, दि. १७ ऑक्टोबर रोजी नवरात्रोत्सवाच्या सातव्या माळेनिमित्त देवीच्या दर्शनासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली होती. रायगव्हाण पंचक्रोशीसह श्रीगोंदा तालुक्यातील विविध गावांमधून भाविकांनी येऊन देवीचे मनोभावे दर्शन घेतले. या दिवशी सुमारे ५० हजारांहून अधिक भाविकांनी दर्शन घेतल्याची माहिती श्री जगदंबा मंदिर ट्रस्टच्या वतीने देण्यात आली.

रायगव्हाण येथील जगदंबा मातेचे देवस्थान परिसरातील भाविकांचे श्रद्धास्थान म्हणून प्रसिद्ध आहे. तुळजापूर येथील जगदंबा मातेचे प्रतिरूप म्हणून या देवीकडे पाहिले जाते. नवसाला पावणारी देवी अशीही मातेची ख्याती असून, विविध शुभकार्यांपूर्वी देवीचा कौल घेण्याची परंपरा आजही भक्तिभावाने जपली जाते.

**तुळजापूरहून पायी ज्योत आणण्याची परंपरा**

नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी गावातील तरुण मंडळी श्रीक्षेत्र तुळजापूर येथून पायी चालत देवीची ज्योत आणतात. नऊ दिवस मंदिर परिसरात देवीचा जागर, धार्मिक विधी आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. अनेक भाविक देवीची आराधना करण्यासाठी मंदिर परिसरात मुक्कामी राहतात. यामुळे संपूर्ण नवरात्रोत्सवात परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होते. नवरात्रोत्सवानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम, खेळ पैठणीचा तसेच देवीच्या भक्तिगीतांचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या कार्यक्रमांमुळे धार्मिक उत्सवाला सांस्कृतिक रंगतही लाभली आहे.

**मंदिर परिसराचा विकास; भाविकांसाठी विविध सुविधा**

श्री जगदंबा मंदिर ट्रस्ट, रायगव्हाण आणि ग्रामपंचायतीच्या वतीने देवस्थान परिसरात भाविकांच्या सोयीसाठी विविध विकासकामे करण्यात आली आहेत. यामध्ये भोजनकक्ष परिसराचे सुशोभीकरण, पाण्याच्या टाकी , पेव्हर ब्लॉक, दर्शन रांगेची व्यवस्था, शौचालये आणि भक्तनिवास अशा सुविधांचा समावेश आहे. श्रीगोंदा तालुक्याचे माजी आमदार बबनराव पाचपुते यांच्या निधीतून १५ लाख रुपयांचे संरक्षक भिंतीचे काम करण्यात आले आहे. विद्यमान आमदार विक्रमसिंह बबनराव पाचपुते यांच्या निधीतून सौरदिवे उपलब्ध झाले आहेत. तसेच उद्योजक विश्वास गुंजाळ यांच्या वतीने इंडस्ट्रियल फॅन उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मंदिराच्या सुशोभीकरणासाठी अनेक भाविकांनीही आर्थिक स्वरूपात देणगी दिली आहे.

**वर्षभर देवीची दोन वेळा आरती**

या देवस्थानात वर्षभर दररोज दोन वेळा देवीची आरती केली जाते. नवरात्रोत्सवाच्या काळात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी श्री जगदंबा मंदिर ट्रस्टच्या वतीने आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे. यापुढेही मंदिर परिसरात भाविकांसाठी विविध विकासकामे करण्यात येणार असल्याचे ट्रस्टच्या वतीने सांगण्यात आले. शारदीय नवरात्रोत्सव यशस्वी करण्यासाठी श्री जगदंबा मंदिर ट्रस्ट, रायगव्हाण येथील तरुण मंडळे, ग्रामस्थ आणि भाविक परिश्रम घेत आहेत.

## दै. आकर्षण निवडक

### राज्य केमिस्ट असोसिएशनच्या त्रैवार्षिक सभेसह निवडणुकीचे २३ व २४ ऑक्टोबरला शिर्डीत आयोजन!



अहिल्यानगर - महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनच्या त्रैवार्षिक सर्वसाधारण सभेसह निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर शहरातील केमिस्ट भवन येथे नियोजन बैठक पार पडली. महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनची त्रैवार्षिक सर्वसाधारण सभा व निवडणूक शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर आणि शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २०२६ रोजी 'साई पालखी निवारा', निमगाव-निघोज, शिर्डी, ता. राहाता, जि. अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आली आहे. या महत्त्वपूर्ण सभेस राज्यातील सर्व जिल्ह्यांतील सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अहिल्यानगर जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष दत्ता गाडळकर, सचिव आबासाहेब बेद्रे, खजिनदार प्रशांत उबाळे आणि सर्व जिल्हा कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे.अखिल भारतीय व महाराष्ट्र राज्य केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथजी ऊर्फ अप्पासाहेबजी शिंदे आणि सचिव अनिल नावंदर यांच्या मार्गदर्शनाखाली ही त्रैवार्षिक सर्वसाधारण सभा व निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. या सभेच्या नियोजनासाठी अहिल्यानगर शहरातील केमिस्ट भवन येथे आयोजित बैठकीत सभेचे नियोजन, राज्यभरातील सभासदांचा सहभाग आणि निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी अजित पारख, शशांक रासकर, चेतन कर्डिले, गणेश वाणी, भरत सुपेकर, मनिष सोमाणी, मनोज खेडकर आदी उपस्थित होते.महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन ही राज्यातील औषध विक्रेते आणि औषध व्यवसायाशी संबंधित व्यावसायिकांचे प्रतिनिधित्व करणारी महत्त्वपूर्ण संघटना आहे. या संघटनेची त्रैवार्षिक सर्वसाधारण सभा आणि निवडणूक ही राज्यातील औषध विक्रेता बांधवांच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे. त्यामुळे या सभेकडे राज्यभरातील केमिस्ट बांधवांचे लक्ष लागले आहे.या सभेमध्ये संघटनेच्या मागील तीन वर्षांतील कार्याचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच औषध व्यवसायासमोरील विविध प्रश्न, व्यावसायिक अडचणी, बदलती परिस्थिती आणि भविष्यातील आव्हाने यांवर सविस्तर चर्चा होण्याची अपेक्षा आहे. औषध विक्रेत्यांच्या व्यवसायाशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून कोणत्या उपाययोजना करता येतील, यावरही विचारविनिमय होणार आहे. औषध व्यवसायाचे नियमन, औषध विक्रेत्यांच्या व्यावसायिक समस्या, औषध कायद्यांमधील बदल, शासनस्तरावर प्रलंबित असलेले विविध प्रश्न आणि औषध विक्रेता बांधवांच्या हिताशी संबंधित विषय या सभेच्या केंद्रस्थानी राहण्याची शक्यता आहे. बदलत्या व्यावसायिक परिस्थितीत औषध विक्रेत्यांना भेडसावणाऱ्या अडचणींवर संघटनेने प्रभावी भूमिका घेणे, तसेच सदस्यांच्या समस्या संबंधित यंत्रणांपर्यंत पोहोचविणे, याबाबतही या सभेत चर्चा होणे अपेक्षित आहे.या सर्वसाधारण सभेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे संघटनेच्या पुढील त्रैवार्षिक कालावधीसाठी निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. या निवडणुकीच्या माध्यमातून संघटनेच्या आगामी वाटचालीसाठी नेतृत्वाची निवड होणार असल्याने या प्रक्रियेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी, प्रतिनिधी आणि सभासद या निमित्ताने एकत्र येणार आहेत. त्यांच्या सहभागातून संघटनेतील समन्वय वाढविणे, परस्पर सहकार्य अधिक दृढ करणे आणि औषध विक्रेता बांधवांच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडण्यासाठी संघटनात्मक ताकद वाढविणे, हा या सभेमागील महत्त्वाचा उद्देश आहे.शिर्डी येथे होणारी ही त्रैवार्षिक सर्वसाधारण सभा व निवडणूक महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनच्या आगामी वाटचालीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या सभेमुळे राज्यातील औषध विक्रेता बांधवांमध्ये समन्वय, सहकार्य आणि संघटनात्मक एकजूट अधिक वृद्धिंगत होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या त्रैवार्षिक सर्वसाधारण सभा व निवडणुकीसाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांचे अध्यक्ष, सचिव, डेलीगेट्स तसेच अल्टरनेट डेलीगेट्स मेंबर्स यांनी आवर्जून उपस्थित राहावे. सभेमध्ये होणाऱ्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा आणि संघटनेच्या पुढील वाटचालीसाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन अहिल्यानगर जिल्हा केमिस्ट असोसिएशनने केले आहे.

---

राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत अहिल्यानगरच्या तीन मल्लांना सुवर्णपदक; राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

# शालेय क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून खेळाडूंना करिअरच्या विविध संधी – आमदार संग्राम जगताप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पंढरपूर येथे दि. १५ व १६ ऑक्टोबर २०२६ दरम्यान झालेल्या १७ वर्षांखालील राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्यातील पै. संग्राम धोत्रे, पै. कृष्णा शेटे आणि महिला कुस्तीपटू पै. गायत्री खामकर यांनी सुवर्णपदक पटकावले. या तिन्ही सुवर्णपदक विजेत्यांची राष्ट्रीय शालेय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच केंद्रीय विद्यालयाच्या राष्ट्रीय ज्युडो स्पर्धेत रौप्यपदक मिळविणारे पै. शौर्य लष्करे आणि कांस्यपदक विजेते पै. वीर लष्करे यांचाही आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष आमदार संग्राम जगताप, नगरसेवक डॉ. अमोल येवले आणि संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या वतीने या खेळाडूंचा सन्मान करण्यात आला.

या वेळी बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, विद्यार्थ्यांनी बालवयापासूनच शालेय शिक्षणाबरोबर आपल्या आवडीच्या खेळाकडे वळावे. क्रीडा क्षेत्रात करिअर करण्यासाठी विविध संधी उपलब्ध आहेत. जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर विद्यार्थ्यांनी यश संपादन करावे.

राज्य शासनाच्या माध्यमातून अहिल्यानगर शहरात दोन क्रीडा संकुलांची उभारणी करण्यात येत असून, लवकरच ही संकुले खेळाडूंसाठी उपलब्ध होतील. या ठिकाणी विविध खेळांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. शालेय क्रीडा स्पर्धांमधून खेळाडूंना करिअरच्या अनेक संधी मिळतात. तसेच क्रीडा क्षेत्रातील कामगिरीच्या आधारे शासनाच्या विविध नोकऱ्यांमध्ये आरक्षणाचाही लाभ मिळू शकतो, असे आमदार जगताप यांनी सांगितले.

पंढरपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत पै. संग्राम धोत्रे यांनी ११० किलो ग्रीको–रोमन प्रकारात, तर पै. कृष्णा शेटे यांनी ९२ किलो फ्री स्टाईल प्रकारात सुवर्णपदक पटकावले. महिला गटात पै. गायत्री खामकर यांनी ६५ किलो वजनी गटात सुवर्णपदक मिळविले. या यशाबद्दल तिन्ही कुस्तीपटूंचा सत्कार करण्यात आला.

फ्री स्टाईल प्रकारातील सुवर्णपदक विजेते कुस्तीपटू पुढील आठवड्यात दिल्ली येथे, तर ग्रीको–रोमन प्रकारातील कुस्तीपटू हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय शालेय कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत. ही माहिती संघटनेचे सचिव प्रा. डॉ. पै. संतोष भुजबळ यांनी दिली.

केंद्रीय विद्यालयाच्या राष्ट्रीय ज्युडो स्पर्धेत रौप्यपदक पटकावणारे पै. शौर्य लष्करे आणि कांस्यपदक मिळविणारे पै. वीर लष्करे यांचाही या वेळी सत्कार करण्यात आला. कुस्ती आणि ज्युडो या खेळांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंच्या यशाचे उपस्थितांनी कौतुक केले.



**आई राजा उदो उदो....** नवरात्र उत्सवानिमित्त गोरेगाव (पारनेर) येथील मळगंगा देवी मंदिरात घटस्थापना झाली. ८ व्या माळेला चांगले धान उगवले.भाविकांनी अष्टमीला होमाच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. (छाया–विजय मते)

---

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भापकर वस्तीला 'आदर्श शाळा पुरस्कार'



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भापकर वस्तीची राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त आदर्श शिक्षक सोमनाथ कळसकर गुरुजी प्रतिष्ठान, संगमनेर यांच्या वतीने दिल्या जाणाऱ्या 'आदर्श शाळा पुरस्कारासाठी' निवड करुन पुरस्कार देण्यात आला. या पुरस्कारामुळे भापकर वस्ती शाळेच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा गौरव झाला असून, परिसरातून शाळेचे अभिनंदन करण्यात येत आहे.

प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी शैक्षणिक गुणवत्ता, भौतिक सुविधा, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, शालेय उपक्रम, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील कामगिरी, शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामपंचायतीचा सहभाग तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान केला जातो. यंदाच्या पुरस्कारासाठी प्राप्त प्रस्तावांचे प्रतिष्ठानच्या निवड समितीने सखोल परीक्षण व सर्वंकष मूल्यमापन केले. त्यामध्ये भापकर वस्ती शाळेच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेण्यात आली.

या पुरस्काराचे वितरण रविवार, दिनांक १८. ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता संगमनेर येथील मालपाणी लॉन्स येथे झाले. शिक्षणतज्ज्ञ तथा गीता परिवाराचे अध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांच्या शुभहस्ते तसेच अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत पाच हजार रुपये रोख रक्कम व सन्मान चिन्ह ट्रॉफी देऊन हा पुरस्कार प्रदान आला. या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक आरती तागडे /घेवरीकर व श्रीकांता शिंदे, शाळा व्यवस्थापन समिती रोहिदास दादासाहेब बोडखे, ग्रामपंचायत पदाधिकारी, पालक व ग्रामस्थ यांचे अभिनंदन होत आहे.

## भक्तांच्या नवसाला पावणारी आई कोळाई देवी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**श्रीगोंदा** – कोळगाव ता श्रीगोदा येथील ऊंच टेकडीवर स्थान असलेल्या आई कोळाई देवी चा नवरात्र उत्सवाचा जागर सुर असुन पंचक्रोशी सह दुर वरुण अनेक भावीक दर्शनासाठी येत आहेत . कोळाई देवी हि भक्तांच्या हाकेला धावुन येणारी देवी आहे अशी भाविकांची श्रध्दा आहे अनेक भाविकांनी यांची अनुभूती घेतली आहे. कोळुआई हे देवीचे प्राचीन नाव आहे. या नावावरुणच गावाला कोळगाव हे नाव पडले अशी कथा ऐकण्यास मिळते नवरात्रात मंदिरात भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होते. मंदिरावर मोठ्या प्रमाणावर आकर्षक अशी विद्युत रोषनाई करण्यात आली आहे. सकाळी ५:३० च्या आरतीला मोठ्या प्रमाणावर गर्दी होते. तर सायंकाळच्या आरतीला महिला मोठ्या प्रमाणावर उपस्थित असल्याचे दिसून येते शनिवार दिनांक १७ रोजी सातवी माळ होती दुष्काळी परिस्थिती असताना सुद्धा भाविकांनी गर्दीचा उच्चांक केला. मंदिरामध्ये नऊ दिवस महिला व पुरुष भाविक घटी बसलेले आहेत. दररोज सायंकाळच्या आरती नंतर उंच अशा दीपमाळीवर ज्योत प्रज्वलित केली जाते. मंदिराचे दगडी बांधकाम स्थापत्यशास्त्राचा उत्तम नमुना आहे. तर मंदिरासमोरील महाराष्ट्रात कुठेही पाहायला मिळत नाही असा कुस्तीचा आखाडा देखील हजारो माणसे बसून कुस्ती पाहू शकतात अशी रचना आहे.अनेक भाविक श्रद्धेने देवीला नवस बोलतात देवी नवसाला पावते अशी भाविकांची मोठी श्रद्धा आहे. मंदिरापासून जवळच असलेल्या पळसा नदीच्या काठावर मोठा खडक आहे ज्या ठिकाणी देवी गुप्त झाली. त्या ठिकाणी खडकात उमटलेले घोड्याचे पावले पाहण्यासाठी आजही भाविक त्या ठिकाणी आवर्जुन जातात. चालू वर्षी नवरात्र उत्सव सुरु होण्यापुर्वीच अनेक प्रकारची दुकाने खेळणी वाले पाळणे वाले मंदिर परीसरात दोन दिवस आधीच दाखल झाले होते . सोमवार दिनांक १९ रोजी सकाळी आरती नंतर आठ वाजता गावातील ब्राह्मण देवांच्या मंत्र घोषात होम हवनाला सुरुवात होईल मंगळवार दिनांक वीस रोजी दसरा असून सायंकाळच्या आरती नंतर देवीची पालखी सिमोलंघनासाठी फटाक्यांच्या आतिषबाजीत वाजत गाजत गाव प्रदक्षिणेसाठी मिरवली जाईल कोळगाव चा इतिहासिक शाही दसरा संपन्न होईल. अशी माहिती देवीचे पुजारी राजेंद्र गुरव व संतोष गुरव यांनी दिली

---

## गजराज नगरला वैष्णोदेवी मंदिरात तुळजाभवानी पालखीची आरती

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नगर - छत्रपती संभाजी नगर रोडवरील गजराज नगर येथील वैष्णोदेवी मंदिरात नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

सोमवारी दुपारी बारा वाजता तुळजापूर येथून निघालेल्या पालखीचे आज ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. गजराज नगर येथे महिलांनी संपूर्ण रस्त्यावर सडा, रांगोळी टाकून या पालखीचे स्वागत केले. वैष्णोदेवी मंदिरात पालखीचे सुवासिनींचे हस्ते पूजन करून त्यांच्या हस्ते आरती करण्यात आली. यावेळी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांना उपवासाचे फराळाचे वाटप करण्यात आले. गजराज नगर येथील सर्व तरुण कार्यकर्त्यांनी पालखी खांद्यावर घेत परिसरातून मिरवणूक काढली यावेळी जय भवानी जय शिवाजी, आई राजा उदो उदो अशा घोषणा देण्यात आल्या.

## 'जय माता दी'च्या जयघोषाने गुलमोहर रोड दुमदुमला

### मोरया युवा प्रतिष्ठानचा 'माता की चौकी' सोहळा भक्तिमय वातावरणात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नवरात्रोत्सवानिमित्त सावेडी येथील गुलमोहर रोडवरील मोरया युवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'माता की चौकी' हा धार्मिक कार्यक्रम भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला. देवीच्या सुमधुर भक्तिगीतांनी मंत्रमुग्ध झालेल्या भाविकांनी 'जय माता दी'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून सोडला. देवीच्या विविध रूपांचे दर्शन घडविणाऱ्या भक्तिगीतांसह धार्मिक गीतांच्या सादरीकरणाने कार्यक्रमात भक्तीचा रंग भरला. 'जय श्रीराम' या गीताच्या सादरीकरणावेळी अवतरलेल्या हनुमानजींच्या प्रतिकृतीने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

जय वैष्णो माता जागरण मंडळाच्या वतीने बल्लू सचदेव यांनी देवीची विविध भक्तिगीते सादर केली. देवीच्या महिम्याचे वर्णन करणाऱ्या आणि तिच्या विविध रूपांचे दर्शन घडविणाऱ्या गीतांनी उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. वाद्यांच्या सुरेल साथीने सादर झालेल्या भक्तिगीतांवर भाविक तल्लीन झाले होते. प्रत्येक गीताला भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत होता. 'जय माता दी'च्या गजराने मंदिर परिसरातील वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले होते.

रात्री उशिरापर्यंत रंगलेल्या या कार्यक्रमात भाविकांनी देवीच्या भक्तिगीतांचा मनमुराद आनंद लुटला. श्रद्धा, भक्ती आणि सामूहिक सहभागातून साकारलेल्या या सोहळ्यामुळे नवरात्रोत्सवाचा उत्साह अधिकच वाढला. परिसरातील नागरिक, महिला आणि विविध समाजांतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून देवीचा जागर केला.'माता की चौकी' कार्यक्रमाला पार्वती (काकी) जगताप, सुवर्णा सचिन जगताप आणि महापौर ज्योतीताई गाडे यांची उपस्थिती लाभली. त्यांच्या हस्ते देवीची आरती करण्यात आली. यावेळी मोरया युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष अर्जुन मदान यांच्यासह परिसरातील नागरिक, शीख व पंजाबी समाजबांधव, राजकीय पदाधिकारी, नगरसेवक, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि महिलांची मोठी उपस्थिती होती. रंगलेल्या भक्तीगीतांवर उपस्थित पाहुण्यांनी भाविकांसह ठेका धरला होता. देवीच्या आरतीनंतर भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमासाठी उपस्थित राहिलेल्या पाहुण्यांचे स्वागत सौ. अभिलाषा मदान आणि कु. अर्चना मदान यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. मोरया युवा प्रतिष्ठानच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त विधिवत घटस्थापना करून देवीची आकर्षक मूर्ती प्रतिष्ठापित करण्यात आली आहे. संपूर्ण परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून, नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने विविध धार्मिक आणि सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत.

# नेप्तीच्या पै. गायत्री खामकरची राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

### ग्रामस्थांकडून सत्कार करून सन्मान । नेप्तीचे नाव गायत्रीने देशपातळीवर चमकविले – प्रा. एकनाथ होले



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नेप्ती गावची पैलवान कु. गायत्री शिवाजी खामकर हिची हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. तिच्या या यशामुळे नेप्ती गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, प्रतिकूलतेवर मात करीत राष्ट्रीय स्तरावर झेप घेणाऱ्या गायत्रीचे यश परिसरातील मुलींसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

गायत्रीचे आगमन होताच फटाक्यांच्या आतषबाजीत उत्साहात स्वागत करण्यात आले. ग्रामपंचायत कार्यालयासमोर झालेल्या कार्यक्रमात नेप्ती ग्रामस्थांच्यावतीने माजी सरपंच संजय जपकर आणि प्रा. एकनाथ होले यांच्या हस्ते गायत्री खामकर हिचा सत्कार करून सन्मान करण्यात आला. तसेच तिच्या आई , वडील व आजी यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे शिस्तबद्ध आयोजन प्रा. एकनाथ होले यांनी केले.

गायत्रीची यशोगाथा ही संघर्ष, जिद्द आणि मेहनतीचे प्रतीक आहे. आर्थिक परिस्थिती बेताची असतानाही तिने कुस्तीची आवड जपली. मुलगी असून कुस्ती खेळण्याबाबत समाजातून प्रश्न उपस्थित झाले तरी तिने ध्येय सोडले नाही. तिने सावेडी येथील संभाजी राजे कुस्ती संकुलात कुस्तीचे प्रशिक्षण घेतले असून, प्रशिक्षक राजेंद्र कंबोज तसेच तालमीचे संस्थापक अध्यक्ष शिवाजी चव्हाण, युवराज चव्हाण, वस्ताद संदीप गायकवाड, नितीन आव्हाड, यश ताकवणे, अजित वाघ, लक्ष्मण धनगर, शंभू यादव यांचे तिला मोलाचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी प्रा. एकनाथ होले म्हणाले, आजच्या काळात मुलींनी शिक्षणासोबत क्रीडा क्षेत्रातही पुढे येण्याची गरज आहे. मुलगी आहे म्हणून तिच्या स्वप्नांवर मर्यादा घालू नयेत. पालकांनी आपल्या मुलींना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. गायत्रीसारख्या खेळाडूंना गावाने पाठबळ दिल्यास भविष्यात नेप्ती गावातून अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडू शकतात. गायत्रीने राष्ट्रीय स्पर्धेतही उत्तम कामगिरी करून महाराष्ट्राचा नावलौकिक वाढवावा. नेप्तीचे नाव गायत्री खामकर हिने देशपातळीवर चमकविले असे प्रतिपादन प्रा. एकनाथ होले यांनी केले.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल: dainikaakarshan@gmail.com. (✻ पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### मॉल, मल्टिप्लेक्स, हॉटेल्स, रेस्टॉरंट व पेट्रोल पंपांमध्ये महिलांसाठी मोफत स्वच्छतागृह सुविधा उपलब्ध करा!



अहिल्यानगर - अहिल्यानगर शहरातील मॉल, मल्टिप्लेक्स, हॉटेल्स, रेस्टॉरंट, पेट्रोल पंप तसेच इतर व्यावसायिक आस्थापनांमध्ये महिलांसाठी स्वच्छतागृहांची सुविधा विनामूल्य उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपालीताई बारस्कर यांनी आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. शहरात विविध कामांसाठी येणाऱ्या महिला व मुलींना स्वच्छतागृहांच्या अभावामुळे होणारी गैरसोय दूर करण्यासाठी महानगरपालिकेने संबंधित आस्थापनांना आवश्यक सूचना द्याव्यात, अशी मागणीही त्यांनी केली आहे. दिपालीताई बारस्कर यांनी निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर शहरात शिक्षण, नोकरी, व्यवसाय, खरेदी, आरोग्यसेवा तसेच इतर विविध कामांसाठी दररोज मोठ्या संख्येने महिला व मुली ये-जा करतात.

### उद्योजक गुलशन कंत्रोड यांचे निधन



अहिल्यानगर - शहरातील उद्योजक व गुरु अर्जुन सामाजिक प्रतिष्ठान आणि घर घर लंगर सेवेचे सेवादार गुलशन बिकमदास कंत्रोड यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या निधनाने सामाजिक सेवेतील एक परिचित चेहरा हरपला आहे.घर घर लंगर सेवेच्या माध्यमातून गुलशन कंत्रोड गेल्या पाच वर्षांपासून दर महिन्याला नियमितपणे गुप्त सेवा देत होते. सायकल वाटप, शालेय साहित्य किट, राष्ट्रीय एकात्मता युवा शिबिर, महाराष्ट्र व पंजाबमधील पूरग्रस्तांना मदत आणि जनावरांसाठी चारा अशा विविध उपक्रमांमध्येही त्यांचे योगदान होते. मनमिळावू स्वभाव व परखड भाष्याने ते सर्वांना सुपरिचित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, विवाहित दोन मुली, जावई, नातवंडे, एक बहीण असा परिवार आहे. माजी नगरसेवक राजेंद्र कंत्रोड यांचे ते बंधू होते. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे.

### चतुरा थोरवे यांचे निधन



अहिल्यानगर - सावेडीतील सोनानगर चौक येथील ज्येष्ठ नागरिक चतुरा राजाराम थोरवे यांचे १५ ऑक्टोबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या ७० वर्षांच्या होत्या. त्यांच्यामागे पती, तीन मुली व एक मुलगा, सून, नातवंडे असा मोठा परिवार आहे. मूळ आष्टी तालुक्यातील पुंडी या गावच्या त्या रहिवासी होत्या. मात्र, अनेक वर्षांपासून सावेडीतील सोनानगर चौकातील निवासस्थानी राहत होत्या. त्या खूप शांत, मनमिळावू व धार्मिक स्वभावाच्या असल्याने त्यांचा मोठा स्नेही परिवार होता. कर्जत तालुका दूध संघाचे संकलन विभागप्रमुख राजाराम थोरवे यांच्या त्या पत्नी, तर पालघर कोषागार कार्यालयातील कनिष्ठ लेखापाल संदीप थोरवे, पाऊलबुद्धे महाविद्यालयाच्या प्रा. भारती औटी, कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठातील प्रा. डॉ. ज्योती खराडे व करमाळ्याच्या स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. प्रीती शेटे यांच्या त्या मातोश्री होत.

# नवरात्रोत्सवानिमित्त भाविकांची सेवा करण्याची संधी मिळणे ही समाधानाची बाब – योगेश गलांडे

**एमआयडीसीच्या रेणुका माता मंदिरात युवा सेनेच्या वतीने भाविकांना खिचडी व फळांचे वाटप**




दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** एमआयडीसी नवनागापूर येथील श्री रेणुका माता देवस्थानात नवरात्रोत्सवाच्या सातव्या माळेनिमित्त दर्शनासाठी आलेल्या भाविकांना युवा सेनेच्या वतीने खिचडी व फळांचे वाटप करण्यात आले. तर राज्यातील दुष्काळ हटावा याकरिता पाऊसासाठी रेणुका माता चरणी साकडे घालण्यात आले. पाऊस पडून बळीराजाला सुख-सुमृध्दी येण्यासाठी प्रार्थना करण्यात आली.

युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे यांच्या पुढाकारातून खिचडी व फळ वाटप उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचा तब्बल दोन हजार भाविकांनी लाभ घेतला. युवा सेनेने धार्मिक उत्सवाच्या निमित्ताने भाविकांची सेवा करण्याच्या उद्देशाने राबविला. नवरात्रोत्सवानिमित्त श्री रेणुका माता देवस्थानात दररोज मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत आहेत. सातव्या माळेनिमित्त मंदिरात दर्शनासाठी मोठी गर्दी असते. भाविकांना उपवासाच्या काळात खिचडी व फळांचा लाभ मिळावा, या उद्देशाने युवा सेनेच्या वतीने वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. मंदिर परिसरात नियोजनबद्ध पद्धतीने भाविकांना खिचडी व फळांचे वाटप करण्यात आले. या सेवाभावी उपक्रमात युवा सेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक आणि कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, शहरप्रमुख संभाजी कदम, रणजीत परदेशी, विक्रम राठोड, दत्तात्रय तापकीरे, श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर, साहेबराव भोर, सचिव दत्तात्रय विटेकर, शंकर शेळके, अमित बारवकर, सुनील शेवाळे, विशाल गीते, सागर गलांडे, वैष्णव गलांडे, शिव वाकळे, पवन शिरसागर, शिवराज गलांडे, गौरव पाटोळे, अमोल घुटे, स्वप्निल भरड, अजिनाथ शिरसाट, अभिजीत सांबारे, जितेंद्र तळेकर, वसीम शेख, अमोल ठोकळ, सचिन खेसे, अमोल म्हेत्रे, नामदेव झेंडे, फिरोज शेख, किसन तरटे, शरद थोरात, सोमनाथ आंधळे, रामनाथ घुगे, विष्णू घुगे, भरत दिंडे, राहुल मेहेरखाब, नितीन खेसे, अविनाश कर्डिले, संदीप मगर, तुषार शेवाळे, अशोक भगत, सागर पवार, हर्षवर्धन वाकळे, गुरु वाकळे, चैतन्य वाकळे, यश नर्सिंगपुरकर, सोमनाथ बारबोले, विक्रम नितनवरे, सुशील पवार, प्रवीण सोनवणे, वाल्मीक पाटील, सागर घोडके आणि अमोल पालवे यांच्यासह युवा सेनेचे कार्यकर्ते व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे म्हणाले की, युवा सेनेच्या माध्यमातून नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचा सर्वसामान्य नागरिक, कष्टकरी कामगार आणि दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना लाभ झाला. धार्मिक सण-उत्सवांच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचून त्यांची सेवा करण्याचा प्रयत्न युवा सेनेकडून केला जात आहे. सामाजिक बांधिलकी जपत अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

शिवसेना शहरप्रमुख संभाजी कदम म्हणाले की, युवा सेना धर्म, सेवा आणि समाजकारण या विचारांना केंद्रस्थानी ठेवून समाजात योगदान देत आहे. धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबवून समाजातील विविध घटकांशी जोडले जाण्याचे काम युवा सेनेकडून केले जात आहे. एमआयडीसी परिसरात युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने युवक आणि कामगार वर्ग युवा सेनेशी जोडला गेला असल्याचे स्पष्ट केले.

युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे म्हणाले की, श्री रेणुका माता देवस्थानात नवरात्रोत्सवानिमित्त दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना उपवासाच्या काळात खिचडी व फळांची सेवा देता यावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. धार्मिक सण आणि उत्सव केवळ भक्तिभावाने साजरे न करता त्यांना सामाजिक उपक्रमांची जोड देऊन समाजोपयोगी कार्य करण्याचा युवा सेनेचा प्रयत्न आहे. भाविकांची सेवा करण्याची संधी मिळणे ही समाधानाची बाब असून, यापुढेही युवा सेनेच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा त्यांनी मानस व्यक्त केला.

# स्पर्धा परीक्षा आणि शैक्षणिक बदलाचे वारे या विषयावर ज्येष्ठ पत्रकार विलास बडे यांचे २५ ऑक्टोबरला व्याख्यान

**ढाकणे शैक्षणिक संकुलात प्रेरणा दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन; विद्यार्थ्यांसह पालकांनाही लाभ घेण्याचे आवाहन**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**शेवगाव–** केदारेश्वर ग्रामीण विकास प्रतिष्ठान, संगमनेर संचलित ढाकणे शैक्षणिक संकुल, राक्षी, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर यांच्या वतीने संस्थेच्या प्रेरणास्थान व ढाकणे परिवाराच्या मातोश्री कै. सौ. सुनीताताई एकनाथराव ढाकणे यांच्या २२ व्या पुण्यस्मरणानिमित्त रविवार, दिनांक २५ ऑक्टोबर २०२६ रोजी 'प्रेरणा दिन' आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त विद्यार्थ्यांसाठी आणि पालकांसाठी ज्येष्ठ पत्रकार विलास बडे यांचे 'स्पर्धा परीक्षा आणि शैक्षणिक बदलाचे वारे' या विषयावर उद्बोधक व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. समाजभूषण एकनाथराव ढाकणे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शेवगाव-राक्षी येथे सकाळी ११ वाजता हे व्याख्यान होणार आहे. आयबीएन लोकमतचे चीफ एक्झिक्युटिव्ह उपसंपादक म्हणून कार्य केलेले ज्येष्ठ पत्रकार विलास बडे हे महाराष्ट्रभर 'बडे मुद्दे' या उपक्रमांतर्गत सामाजिक प्रश्न, समाजजागृती तसेच न्याय-अन्यायाच्या विविध प्रश्नांवर सडेतोड भूमिका मांडण्यासाठी परिचित आहेत. त्यांच्या व्याख्यानातून स्पर्धा परीक्षांचे बदलते स्वरूप, शिक्षण क्षेत्रातील नवे प्रवाह, विद्यार्थ्यांसमोरील आव्हाने आणि करिअरच्या विविध संधी यांविषयी मार्गदर्शन मिळणार आहे.

या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील शेतकरी नेते रविकांत तुपकर, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे उपसचिव गौरव देहाडे, डॉ. तुकाराम नेहरकर, डॉ. संदीप पालवे तसेच संस्थेचे सर्व विश्वस्त उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे




अध्यक्षस्थान संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एकनाथराव ढाकणे भूषविणार आहेत. प्रेरणा दिनानिमित्त संस्थेच्या नूतनीकरण केलेल्या प्रवेशद्वाराचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन तसेच रक्तदान शिबिरासह विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

**विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनाची सुवर्णसंधी**

आजच्या स्पर्धात्मक युगात स्पर्धा परीक्षांचे नियोजन, योग्य अभ्यासपद्धती, शैक्षणिक क्षेत्रातील बदल आणि करिअरच्या संधी यांची माहिती विद्यार्थ्यांना मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेले हे व्याख्यान विद्यार्थ्यांसह पालकांसाठीही उपयुक्त ठरणार आहे. परिसरातील विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षणप्रेमी नागरिक आणि विविध क्षेत्रांतील पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. श्रीकांत एकनाथराव ढाकणे आणि कोषाध्यक्ष ऋषिकेश एकनाथराव ढाकणे यांनी केले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थेचे सर्व विश्वस्त, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

# सुवालालजी गुंदेचा यांचा आदर्श समोर ठेवल्याने मला मर्चटस बँकेत सातत्याने यश – संजय चोपडा

**स्व. सुवालालजी गुंदेचा यांना पुण्य स्मृतीनिमित्त अभिवादन**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सहकार महर्षी स्व. सुवालालजी गुंदेचा यांनी सहकार क्षेत्रात प्रामाणिक व सभासदांचे हिताचे काम केले. यामुळे ते नगर अर्बन बँकेचे सतत ४८ वर्ष संचालक राहीले. अनेकदा चेअरमन म्हणूनही काम केले. ते चेअरमन असताना नगर अर्बन बँकेने सतत प्रगतीच केली होती. १२ वर्षांच्या चेअरमनपदाच्या काळात बँक सतत अ वर्गात होती. सभासदांना पूर्ण १५ टक्के लाभांश मिळाला. बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षात सभासदांना चांदीच्या नाण्याची भेट मिळाली.

एका सर्वसामान्य व कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या कुटुंबातून आलेल्या स्व. सुवालालजींनी सहकार क्षेत्रात एकदाही पराभव पाहीला नाही. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून मी देखील नगर मर्चंटस बँकेत काम करत आहे. त्यामुळे माझ्या सारख्या सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तीला मर्चंटस बँकेत सतत यश मिळाले. २५ वर्षात एकदाही पराभव झाला नाही व माझ्या चेअरमन पदाच्या काळात सभासदांना ५१०० रूपयांची ठेव पावती भेट म्हणून मिळत आहे.

जैन ओसवाल पतसंस्थेची निर्मिती करताना स्व. सुवालालजींनी दूरदृष्टी ठेवली. शुध्द बिजा पोटी फळे रसाळ गोमटी या उक्ती प्रमाणे ती संस्था देखील भरभराटीला आली.

ही पतसंस्था म्हणजे सुवालालजींनी समाजाला दिलेली मोठी भेट आहे, असे प्रतिपादन अहमदनगर मर्चंटस को ऑप. बँकेचे चेअरमन संजय चोपडा यांनी केले.

स्व. सुवालालजी गुंदेचा यांच्या ८ व्या पुण्यस्मृती दिनानिमित्त त्यांना अभिवादन करताना संजय चोपडा यांनी अनेक आठवणींना उजाळा दिला. सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेतील स्व. सुवालालजी यांच्या प्रतिमेला पुष्पहार व फुलांची सुमनांजली वाहून अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी स्व. सुवालालजी गुंदेचा यांच्याबरोबर पतसंस्था स्थापनेत सहभाग घेतलेले पतसंस्थेचे व नगर अर्बन बँकेचे माजी संचालक राजेंद्र गांधी, स्व. सुवालालजी गुंदेचा यांचे चिरंजीव व पतसंस्थेचे माजी चेअरमन व विद्यमान संचालक मनोज गुंदेचा तसेच पतसंस्थेचे सर्व अधिकारी, कर्मचारी,सभासद उपस्थित होते.

राजेंद्र गांधी म्हणाले, स्व. सुवालालजी गुंदेचा हे माझे गुरू होते. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच मी सहकार क्षेत्रात काम केले. त्यामुळेच नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांच्या ठेवींची काळजी घेता आली. त्यांच्यामुळेच मी नगर अर्बन बँकेचा व पतसंस्थेचा संचालक होवू शकलो.

मनोज गुंदेचा म्हणाले, वडीलांच्या कामाचा वारसा पुढे चालविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहे. त्यांची शिकवण व आदर्श घेवून पतसंस्थेत काम केल्यामुळे त्यांनी स्थापन केलेल्या पतसंस्थेत सलग २५ वर्ष सभासदांना १५ टक्के लाभांश मिळाला आहे. त्यांचे नांव पतसंस्थेला असल्याने सभासद व ठेवीदारांचा पतसंस्थेवर कायम विश्वास राहीला आहे.

# मुंबई उच्च न्यायालयाने फटाका विक्री करण्यास अगर वाजवण्यास बंदी केलेली नाही- श्रीनिवास बोज्जा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** नुकतेच मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश श्री जी एस कुलकर्णी व न्यायाधीश नीला गोखले यांनी फटाके सार्वजनिक ठिकाणी एक वर्षभर वाजवू नये असा स्वइच्छेने आदेश दिला, या आदेशाचा नागरिक व व्यापाऱ्यांमध्ये संभ्रवना अवस्था निर्माण झाली असून मे.कोर्टाने आदेशा मध्ये फटाके वाजवू नये, उत्पादित करू नये अगर विक्री करू नये असा कोणताही उल्लेख केलेला नाही त्यामुळे नागरिकांनी दिवाळी सण फटाके वाजवून साजरा करता येईल यात शंका नाही अशी माहिती दि अहमदनगर फटाका व्यापारी असो चे मा. अध्यक्ष श्रीनिवास बोज्जा यांनी माहिती दिली.

दिवाळी हा सण हिंदू धर्माचाच नव्हे तर सर्व धर्मियांचा असून ते सालोना साल मोठ्या उत्साहाने फटाके वाजवून साजरा करीत आलेले आहेत त्या मुळे लोकांचे धार्मिक भावना या आदेशामुळे कुठेही दखावले गेलेले नाहीत,त्यामुळे फटाका वाजवण्यासाठी नागरिकांना कोणतीही हरकत घेतलेली नसून फक्त सार्वजनिक ठिकाणी फटाके वाजवू नये असा आदेश केलेला आहे त्यामुळे नागरिकांना फटाके आपल्या घरा समोर, गल्ली बोळीत, अगर आपल्या अपार्टमेंटच्या पॅसेज मध्ये वाजवू शकता, तसेच व्यापाऱ्यांनी ही या आदेशाची कोणतीही धास्ती घेण्याची गरज नाही, फटाके विक्री करू नये असा कुठेही उल्लेख आदेशा मध्ये केलेला नसल्यामुळे फटाका व्यापारी फटाका विक्रीचा व्यवसाय बिन दिखखत करू शकतात.

फटाक्या व्यवसायावर महाराष्ट्रसह संपूर्ण भारतात लाखो कुटुंबे अवलंबून असून फटाके विक्रीचा व्यवसाय करून आपली उपजीविका चालवतात त्या मुळे सदर व्यवसायावर बंदी आणणे अशक्य आहे. सदर फटाका व्यवसाया मुळे अनेक बेरोजगारांना दिवाळी सणात रोजगार उपलब्ध होते व या व्यवसायामुळेच यांची दिवाळी साजरी होते. या साठी महाराष्ट्रातील सर्व फटाका व्यापाऱ्यांनी फटाके विक्रीचा व्यवसाय उत्तम प्रकारे करावे असे आवाहन अहिल्यानगर येथील नगर कल्याण रोड वरील होलसेल फटाका मार्केट चे व्यापारी व फटाका असो चे माजी अध्यक्ष श्रीनिवास बोज्जा यांनी आवाहन केले आहे.

# दुष्काळावर कायमस्वरूपी उपायांसाठी स्वतंत्र आराखडा तयार करा!

**डॉ. सुनील शिंदे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण–** पैठण तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी केवळ तात्पुरत्या उपाययोजना न करता आगामी सहा ते आठ महिन्यांचा स्वतंत्र दुष्काळ व्यवस्थापन आराखडा तयार करावा, अशी मागणी माजी जिल्हा परिषद बांधकाम सभापती तथा सदस्य डॉ. सुनील शिंदे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. दुष्काळाच्या संकटाचा सामना करण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच नियोजनबद्ध आणि दूरगामी उपाययोजना राबवाव्यात, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

दुष्काळाचा परिणाम केवळ पिण्याच्या पाण्याच्या टंचाईपुरता मर्यादित नसून शेती, पशुधन, ग्रामीण रोजगार, स्थानिक अर्थव्यवस्था आणि नागरिकांच्या आरोग्यावरही होत आहे. आगामी काळात परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता लक्षात घेता प्रशासनाने सर्वंकष नियोजन करणे आवश्यक असल्याचे डॉ. शिंदे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

**जलसाठ्यांवर लक्ष, अनावश्यक उपसा रोखण्याची मागणी**

नायगाव परिसरासह तालुक्यातील धरणे, तलाव आणि बंधाऱ्यांमधील पाणीसाठ्याचे नियमित निरीक्षण करावे. उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करून पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, तसेच अनावश्यक पाणीउसा रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे. सौरऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन देण्याबरोबरच सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्यावरही भर देण्याची सूचना करण्यात आली आहे.

**जलसंधारणातून रोजगारनिर्मितीवर भर**

दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण भागातील मजुरांच्या हाताला काम मिळावे आणि भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता कमी व्हावी, यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जलसंधारणाची कामे प्राधान्याने हाती घ्यावीत. ही कामे रोजगाराभिमुख पद्धतीने राबविल्यास ग्रामीण कुटुंबांना आर्थिक आधार मिळण्यासोबतच जलसाठवण क्षमता वाढविण्यास मदत होईल, असेही डॉ. शिंदे यांनी स्पष्ट केले.

**तात्पुरत्या मदतीऐवजी दीर्घकालीन नियोजनाची गरज**

दुष्काळ निवारणासाठी पाणीपुरवठा, शेती, पशुधन संवर्धन आणि रोजगार या सर्व बाबींचा एकत्रित विचार करून स्वतंत्र आराखडा तयार करणे गरजेचे आहे. संभाव्य पाणीटंचाई, शेतकऱ्यांच्या अडचणी आणि ग्रामीण भागातील रोजगाराचा प्रश्न लक्षात घेऊन उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी. केवळ संकट उद्भवल्यानंतर उपाय शोधण्याऐवजी आधीच नियोजन करून दुष्काळाचा सामना करण्याची तयारी प्रशासनाने ठेवावी, अशी मागणी डॉ. सुनील शिंदे यांनी केली आहे.

# भगवान भक्तीगडावरील दसरा मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहा - अरुण मुंढे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**शेवगाव–** सावरगाव घाट येथील भगवान भक्तीगडावर २० ऑक्टोबर रोजी होणाऱ्या दसरा मेळाव्यास शेवगाव शहर व तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवसेना नेते अरुण मुंढे यांनी केले आहे.

लोकनेत्या तथा राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मेळावा होणार आहे. या मेळाव्यासंदर्भात अरुण मुंढे यांनी काल शेवगाव येथील आपल्या जनसंपर्क कार्यालयात पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक घेतली. यावेळी शेवगाव शहर व तालुक्यातून जास्तीत जास्त नागरिकांनी मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले. राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या जन्मभूमीत होणाऱ्या या दसरा मेळाव्याला दरवर्षी राज्यभरातून भगवान बाबांचे भक्त आणि मुंडे


(छाया : बाबा पालवे)

समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. यंदाही मेळाव्यात लोकनेत्या मा.पंकजाताई मुंडे यांचे विचार व मार्गदर्शन ऐकण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे शेवगाव तालुक्यातील नागरिकांनी या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवसेना नेते अरुण मुंढे यांनी केले.

यावेळी या बैठकीस प्रेमभाऊ जाजू, सालारभाई शेख, राजूभाऊ तरटे, नगरसेवक कमलेश गांधी, नंदकुमार मुंढे, दिगंबर तात्या काथवटे, अंकुश कुसळकर, अजय भारस्कर, शब्बीरभाई शेख, सतीशभाऊ मगर, अ‍ॅड. शामभाऊ कंनगरे, भूषण देशमुख, नितीन फुंदे, पप्पू केदार, एकनाथ कुसळकर, राजू नाईक, अविनाश ढाकणे, रमेश ढाकणे, भीमा ढाकणे, संपत घुगे, कानिफ साखरे, सुनील जगताप, विशाल आव्हाड, सोमनाथ शिंदे, संजय राऊत, ऋतिक भाडाईत, अभिषेक गालफाडे, आदित्य नाईक, सुरेश मामडे, अशोक वनवे, अशोक आधाट, अभय पालवे, महेश मारकड आणि अंकुश ढाकणे यांच्यासह इतर सहकारी व मित्रपरिवार उपस्थित होता.

# दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, पांढरी डिजीटल काठी, सॅक आणि स्मार्ट किटचे वितरण

**अहिल्यानगरमध्ये जागतिक पांढरी काठी दिन उत्साहात साजरा**
**दिव्यांगांचा सन्मान, स्वावलंबन आणि सक्षमीकरणाचा जागर**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ''प्रत्येक पावलात सन्मान, प्रत्येक संधीमध्ये समानता आणि प्रत्येक स्वप्नाला भरारी घेण्याची संधी!'' या प्रेरणादायी विचाराला केंद्रस्थानी ठेवून अहिल्यानगर येथे जागतिक पांढरी काठी दिन २०२६ उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. दृष्टिबाधित व्यक्तींच्या स्वावलंबनाला प्रोत्साहन देणे, त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणे, शासकीय योजनांची माहिती उपलब्ध करून देणे आणि समाजामध्ये समानता व समावेशकतेची भावना दृढ करणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

दिव्य दृष्टी दिव्यांग विकास व संशोधन संस्था आणि शोभा सर्वोदय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, प्रशासकीय अधिकारी, तज्ज्ञ आणि दिव्यांग बांधव सहभागी झाले. कार्यक्रमाच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींना केवळ सहानुभूती नव्हे, तर समान संधी, योग्य मार्गदर्शन आणि स्वाभिमानाने जगण्यासाठी आवश्यक पाठबळ देण्याचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी धनश्रीताई विखे पाटील, उद्योजक नरेंद्र फिरोदिया, ब्रिगेडियर राजीव चावला, वरिष्ठ डाक अधीक्षक विकास पालवे, उपअधीक्षक शिरीष वमने, बँक ऑफ बडोदाचे मनीष कुमार, हरजीतसिंग वधवा, दिव्य दृष्टी संस्थेचे कृष्णा तवले, . . चे मुख्य कार्यकारी अधिकारीसुमन कुरेल आदी उपस्थिती होते.

दिव्यांगांना समाजाच्या प्रवाहात येण्यासाठी प्रोत्साहन देण्याची गरज असल्याचे धनश्रीताई विखे यांनी सांगितले. तर समाजसेवेचे महत्त्व अधोरेखित करून प्रत्येकजण समाजसेवा करू शकत असल्याचे स्पष्ट केले. याप्रसंगी शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन कडून ५० विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीचे वितरण या कार्यक्रमात केले गेले. त्याचप्रमाणे शोभा सर्वोदय फाउंडेशन कडून एकूण २५० जणांना पांढरी डिजीटल काठीचे वाटप करण्यात आले. बँक ऑफ बडोदा कडून १०० जणांना सॅकचे वाटप करण्यात आले. डॉ.सुजय विखे फाउंडेशन आणि डीआरडीसी मार्फत स्मार्ट किटचे वितरण करण्यात आले. तसेच दिव्यांगासाठी इ सायकलचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमामध्ये दृष्टिबाधित व्यक्तींसाठी पांढऱ्या काठीचे वितरण, प्रेरणादायी मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षांच्या संधी, कृत्रिम बुद्धिमत्ता () व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, आर्थिक समावेशन, बँकिंग सुविधा, गुन्हे प्रतिबंधक जागरूकता तसेच दिव्यांगांसाठीच्या शासकीय योजना व विविध लाभांविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

तिरुपती गायकवाड यांनी दिव्यांगांसाठी उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या उपयोगाविषयी माहिती दिली. बँक ऑफ महाराष्ट्रचे प्रादेशिक व्यवस्थापक रवी रंजन प्रशून यांनी आर्थिक समावेशन व बँकिंग सुविधांबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमातील विशेष आकर्षण म्हणजे दिव्यांग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

जुन्नर येथील सेंटर फॉर डिसॅबिलिटी आर्ट्स डेव्हलपमेंटचे संस्थापक विकास बाजीराव घोगरे, अनामप्रेमच्या सौ. अनिता माने, दृष्टिबाधितांसाठी शिक्षक म्हणून कार्य करणारे सुनील परभणे आणि आकांक्षा रिहॅबिलिटेशन सेंटरच्या संचालिका सविता काळे यांना त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले. या पुरस्कारांच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींच्या विकासासाठी, शिक्षणासाठी, पुनर्वसनासाठी आणि सामाजिक सक्षमीकरणासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याला सलाम करण्यात आला.

जागतिक पांढरी काठी दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्यापुरता मर्यादित नसून, दृष्टिबाधित व्यक्तींच्या स्वातंत्र्याचा, आत्मविश्वासाचा, सुरक्षिततेचा आणि समान हक्कांचा सन्मान करणारा दिवस आहे. पांढरी काठी ही केवळ चालण्याचे साधन नसून ती स्वावलंबन, आत्मविश्वास आणि स्वतंत्र जीवनाचा मार्ग दाखवणारे महत्त्वपूर्ण माध्यम आहे. दिव्यांग व्यक्तींना शिक्षण, रोजगार, तंत्रज्ञान, आर्थिक व्यवहार आणि सार्वजनिक जीवनात समान संधी उपलब्ध करून दिल्यास त्या समाजाच्या प्रगतीमध्ये मोलाचे योगदान देऊ शकतात, हा महत्त्वपूर्ण संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

''दिव्यांगत्व ही मर्यादा नसून, योग्य संधी आणि पाठबळ मिळाल्यास प्रत्येक व्यक्ती आपली क्षमता सिद्ध करू शकते,'' हा संदेश देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# डी.एड.च्या माजी विद्यार्थ्यांचा ४० वर्षांनंतर स्नेहमेळावा

**। जुन्या आठवणींना उजाळा, मैत्रीचा आनंद द्विगुणित**
**। भंडारदर्याच्या निसर्गरम्य वातावरणात १९८४–८६ च्या तुकडीतील शिक्षक पुन्हा एकत्र**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** युनियन अध्यापक विद्यालयात १९८४ ते १९८६ या कालावधीत डी.एड.चे शिक्षण घेतल्यानंतर राज्याच्या विविध भागांत शिक्षक म्हणून सेवा बजावलेल्या माजी विद्यार्थ्यांचा तब्बल ४० वर्षेसहा महिन्यांनंतर भंडारदरा येथे स्नेहमेळावा नुकताच उत्साहात पार पडला. वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या या शिक्षकांनी एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा दिला. निसर्गरम्य वातावरणात मित्रांसोबत घालवलेल्या क्षणांमुळे सर्वांच्या चेहर्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

अहिल्यानगर येथील युनियन अध्यापक विद्यालयाच्या १९८४–८६ च्या तुकडीतील विद्यार्थी डी.एड.चे शिक्षण पूर्ण केल्यानंतर राज्याच्या विविध भागांत शिक्षक म्हणून रुजू झाले होते. त्या काळात गुणवत्तेच्या आधारे डी.एड.ला प्रवेश मिळत असल्याने राज्याच्या वेगवेगळ्या भागांतून विद्यार्थी शिक्षणासाठी आले होते. पुढे अनेकांनी आपल्या अध्यापन कार्यातून विद्यार्थ्यांना घडविण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. काही जण शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, तर काही विस्तार अधिकारी अशा विविध पदांवर कार्यरत राहिले. प्रदीर्घ शैक्षणिक सेवा बजावल्यानंतर हे सर्वजण सेवानिवृत्त झाले.

काळाच्या ओघात प्रत्येक जण आपापल्या कामात आणि संसारात व्यस्त झाला. मात्र, मोबाईल आणि संपर्काच्या माध्यमातून मित्र पुन्हा एकमेकांच्या जवळ आले. त्यातूनच स्नेहमेळाव्याची संकल्पना पुढे आली. दैनंदिन व्यापातून वेळ काढत सर्वांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. भंडारदरा येथील वसंतसुत हॉटेलमध्ये झालेल्या या मेळाव्यात जुन्या वर्गमित्रांनी शैक्षणिक जीवनातील आठवणी, शिक्षक म्हणून केलेला प्रवास आणि आयुष्यातील सुख–दुःखाचे अनुभव एकमेकांशी मनमोकळेपणाने शेअर केले. चार दशकांनंतर पुन्हा एकत्र आल्याने जणू महाविद्यालयीन जीवनातील दिवस पुन्हा अनुभवायला मिळाले.

**– मैत्रीचा धागा कायम ठेवण्याचा संकल्प**

आयुष्याच्या या टप्प्यावर पुन्हा एकत्र येण्याची संधी मिळाल्याने सर्वांनी समाधान व्यक्त केले. आयुष्याच्या उत्तरार्धातील हे क्षण म्हणजे परमेश्वराने दिलेली अनमोल भेट असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या स्नेहमेळाव्यामुळे जुन्या मैत्रीला नव्याने उजाळा मिळाला असून, दरवर्षी असा मेळावा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या मेळाव्यात सुरेंद्र हातवळणे, वसंतराव लोखंडे, तुकाराम वारकड, नामदेवराव पतंगे, सुधाकर शेटे, सुनील बोंडगे, दत्तात्रय मैड, संपत गायकर, भीमराव आंबरे, रामनाथ भालेकर, विष्णू तागड, रामराव ढाकणे, शरदराव सुद्रिक, वाल्मिक शिंदे, दिनकर पारधी, मारुती गायकवाड, शिवाजी नागरे, अशोक विटनोर, आयुब इनामदार, योसेफ मकासरे, रावसाहेब चौधरी, वैजनाथ कर्डिले, रभाजी सोनवणे, अण्णासाहेब खतोडे, शिवाजी ठुबे आणि रावसाहेब सोनवणे सहभागी झाले होते.

मेळाव्याच्या यशस्वितेसाठी सुधाकर शेटे, वसंत लोखंडे, नामदेव पतंगे, रामनाथ भालेकर यांच्यासह सहकारी मित्रपरिवाराने विशेष परिश्रम घेतले. पुढील वर्षी पुन्हा एकदा स्नेहमेळावा घेण्याचा निर्धार करत सर्वांनी आनंदाने एकमेकांचा निरोप घेतला.

# पारनेर शहरातील १ कोटी ७५ लाखांच्या विकासकामांना सुरुवात; आमदार दाते सरांच्या शुभहस्ते भूमिपूजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** पारनेर शहरातील मूलभूत सुविधांना चालना देण्यासाठी आमदार काशिनाथ दाते सर यांच्या विशेष प्रयत्नांतून मंजूर झालेल्या एकूण १ कोटी ७५ लाख रुपयांच्या विविध रस्ते विकासकामांचा भूमिपूजन समारंभ आमदार दातेंच्या शुभहस्ते झाला. या विकासकामांमुळे शहरातील विविध वस्त्यांमधील रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार असून, नागरिकांच्या दैनंदिन दळणवळणाला अधिक सुविधा मिळणार आहेत.

या विकासकामांमध्ये पारनेर नगरपंचायतीच्या प्रभाग क्रमांक २ मधील व्यवहारें वस्ती ते साहेबराव गायकवाड वस्ती रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी २० लाख रुपये, प्रभाग क्रमांक ३ मधील जामगाव रस्त्यापासून विजय औटी यांच्या घरापर्यंत रस्त्यासाठी ४० लाख रुपये मंजूर झाले आहेत. तसेच औटी वस्ती ते ताटळवाडी रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी १५ लाख रुपये, महाजन वस्ती ते दादाभाऊ गायकवाड घर रस्त्याच्या डांबरीकरणासाठी २० लाख रुपये, लोणी रोड ते अंबुले वस्ती रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी ४० लाख रुपये आणि जामगाव रस्त्यापासून ताटळवाडी मारुती मंदिर रस्त्याच्या सुधारणेसाठी ४० लाख रुपये अशा एकूण १ कोटी ७५ लाख रुपयांच्या कामांचा यामध्ये समावेश आहे.

यावेळी आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले, ''पारनेर शहरातील नागरिकांना चांगल्या दर्जाचे रस्ते आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही आमची प्राथमिकता आहे. नागरिकांना रोजच्या प्रवासात होणारा त्रास कमी व्हावा, वस्त्यांना जोडणारे रस्ते सुस्थितीत व्हावेत आणि शहराच्या विकासाला गती मिळावी, या उद्देशाने या कामांसाठी सातत्याने पाठपुरावा केला. या विकासकामांना मंजुरी मिळून आज प्रत्यक्ष कामांचा शुभारंभ होत आहे, याचे समाधान आहे.

विकास हा केवळ आश्वासनांपुरता मर्यादित न राहता प्रत्यक्ष कामातून नागरिकांना अनुभवता आला पाहिजे. मंजूर झालेली सर्व कामे दर्जेदार पद्धतीने आणि नियोजित वेळेत पूर्ण व्हावीत, यासाठी संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी. नागरिकांच्याही विकासकामांबाबत काही सूचना असतील, तर त्या जाणून घेऊन कामे अधिक चांगल्या पद्धतीने करण्याचा आमचा प्रयत्न राहील. पारनेर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहीन.''

या कार्यक्रमास जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, उद्योजक दिलीप दाते, माजी उपनगराध्यक्ष दत्ताशेठ कुलट, विठ्ठलशेठ कावरे, नगरसेवक अशोक चेडे, युवराज पठारे, नवनाथ सोबले, देवराम ठुबे, कांतीलाल ठाणगे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस सुभाष दुधाडे, शहर उपाध्यक्ष सुनील गाडगे, उद्योजक मंगेश दाते, महिला शहराध्यक्षा कविता औटी, सुनिताताई सोबले, सोनाबाई चौधरी, शंकर औटी, रभाजी औटी, मारुती शेरकर, अण्णा औटी, अंबुले सर, दत्ता अंतुले, नितीन औटी, दादाभाऊ गायकवाड, गोरख गायकवाड, संजय औटी, प्रवीण औटी, सहदेव तराळ, शांताराम तराळ, अशोक गायकवाड, दयानंद बढे, विनोद बढे, रोहिदास शेरकर, बाळासाहेब देशमाने, नितीन तराळ, मारुती औटी, अभिषेक औटी, अरुण देशमाने, सुभाष देशमाने, शिवाजी देशमाने, प्रदीप नगरे, त्रिंबक औटी आदी मान्यवर व नागरिक उपस्थित होते. पारनेर शहरातील रस्त्यांची गुणवत्ता सुधारणे, नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित व सुलभ करणे आणि मूलभूत सुविधांचा विस्तार करणे, या दृष्टीने ही विकासकामे महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. मंजूर कामे

# श्रीराम कुस्ती संकुलाच्या खेळाडूंची राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**कै. आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे कुस्तीचे स्वप्न साकारण्याच्या दिशेने वाटचाल; आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते खेळाडूंचा सत्कार**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** येथील श्रीराम कुस्ती संकुलातील खेळाडूंनी विद्यापीठीय आणि शालेय कुस्ती स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय स्पर्धांसाठी निवड मिळवली आहे. या यशामुळे संकुलाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, कै. आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे कुस्ती क्षेत्रातील स्वप्न साकार होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. या यशस्वी खेळाडूंचा आमदार अक्षयदादा शिवाजीराव कर्डिले यांच्या हस्ते सत्कार करून त्यांना पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

फ्रीस्टाइल कुस्ती प्रकारात पैलवान मोहित म्हस्के याची २१ वर्षांखालील ९७ किलो वजन गटातून राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच पैलवान सौरभ मराठे (२३ वर्षांखालील ७९ किलो) आणि अरबाज शेख (२३ वर्षांखालील ७४ किलो) यांची आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

शालेय स्पर्धांमध्येही श्रीराम कुस्ती संकुलाच्या खेळाडूंनी यश मिळवले. फ्रीस्टाइल कुस्ती प्रकारात उत्कर्ष कर्डिले (१९ वर्षांखालील ७४ किलो) आणि समाधान परभणे (१९ वर्षांखालील ९२ किलो), ग्रीको–रोमन कुस्ती प्रकारात संदेश डफळ (१९ वर्षांखालील ७४ किलो), तर ज्युदो प्रकारात अवधूत वायभासे (१९ वर्षांखालील ६६ किलो) यांनी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे.

विभागीय शालेय स्पर्धांमध्येही खेळाडूंनी पदकांची कमाई केली. फ्रीस्टाइल कुस्ती प्रकारात ओम थोरात (१७ वर्षांखालील ४५ किलो), पृथ्वी जाधव (१९ वर्षांखालील ६५ किलो) आणि ओम वाघुले (१९ वर्षांखालील ५५ किलो) यांनी रौप्यपदक पटकावले. ग्रीको–रोमन कुस्ती प्रकारात सोफियान शेख (१७ वर्षांखालील ७१ किलो) याने कांस्यपदक मिळवले.

या खेळाडूंना श्रीराम कुस्ती संकुलाचे मार्गदर्शक वस्ताद सोमनाथ राऊत यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या अथक परिश्रमांमुळे खेळाडूंना यश मिळवता आले. सत्कारप्रसंगी आमदार अक्षयदादा कर्डिले यांनी खेळाडूंचे अभिनंदन करताना, आगामी काळात तालमीसाठी आवश्यक असलेल्या सुविधांची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही दिली.

यावेळी पैलवान संदीपदादा कर्डिले, बुऱ्हाणनगरचे सरपंच रावसाहेब कर्डिले, दत्ता तापकिरे, रवी कर्डिले, अनिल कर्डिले, संजय वायभासे सर, शिकारे सर, कांडेकर सर, शेळके सर, रंगनाथ कर्डिले, नितीन साठे, आप्पा कर्डिले, बाळासाहेब जाधव, सोमनाथ जाधव यांच्यासह खेळाडूंचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारत विद्यालयाच्या पुणे विभागीय स्पर्धेसाठी हर्षदा जाधवची निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** मिरजगाव येथील भारत विद्यालयाची गुणवत्ता केवळ बौद्धिक स्तरावरच नसून मैदानी क्रीडा स्पर्धांमध्ये ही विद्यालयाच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी करून विद्यालयाच्या नावलौकिकात भर टाकला आहे असे गौरवोद्गार विद्यालयाचे चेअरमन डॉ श्री रमेश झरकर यांनी काढले.विद्यालयाची अष्टपैलू खेळाडू कु.हर्षदा जाधव हिच्या सत्कार प्रसंगी ते बोलत होते.विद्यार्थ्यांनी सर्वात अगोदर आपल्या शरीराकडे अधिक लक्ष देऊन व्यायामाच्या आधाराने शरीर मजबूत करावे.साऊंड माईड इन साउंड बॉडी हे नेहमी लक्षात ठेवावे.असे ते म्हणाले.

नुकत्याच प्रवरानगर या ठिकाणी झालेल्या मैदानी स्पर्धेत हर्षदा हीने तिहेरी लांब उडी मध्ये जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावून पुणे विभागीय स्पर्धांसाठी पात्र ठरली.

यावर्षी विद्यालयाने क्रीडा स्पर्धेमध्ये घवघवीत यश मिळवले. ४१००रिले स्पर्धा, ४४००रिले स्पर्धा,३००० मीटर धावणे,१०० मीटर अडथळा शर्यत,तिहेरी लांब उडी या क्रीडा प्रकारामध्ये विद्यालयाचे खेळाडू जिल्हास्तरा करता पात्र झाले होते.यामध्ये कु.हर्षदा जाधव,कु.सिद्धी वारंगुळे, कु.सानवी बरबडे,कु.नंदिनी गायकवाड कु.पूर्व वायाळ या खेळाडूंचा समावेश होता.या सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयाचे क्रीडा शिक्षक श्री सतीश फरताडे यांचे मार्गदर्शन लाभले.

या सत्कार प्रसंगी कु.हर्षदा हिचे वडील श्री.दत्ता जाधव हेही उपस्थित होते.त्यांनी विद्यालयाच्या प्रगती बद्दल समाधान व्यक्त करत हर्षदाच्या यशामध्ये विद्यालयाचा मोठा वाटा असल्याचे मान्य केले.

पुणे विभागीय स्पर्धेसाठी हर्षदा हीला हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष ॲड अनंत फडणीस,मानद सचिव सुमतीलाल कोठारी,माजी मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष अनंत देसाई,ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, प्रशासकीय अधिकारी संजय मुदगल व मंडळाचे सर्व पदाधिकारी यांनी सुयश चिंतेले.

(पान १ वरून)

## वाळूतस्करांवर एलसीबीची धडक कारवाई

गावच्या शिवारात बोरवाक नदीच्या ओढ्याशेजारी करण्यात आली. तेथे जेसीबी आणि ट्रॅक्टरच्या साहाय्याने वाळू उपसा सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळताच पोलिसांनी छापा टाकला. घटनास्थळावरून ५६ लाख ५ हजार रुपये किमतीचे दोन जेसीबी, एक सोनालिका कंपनीचा ट्रॅक्टर–ट्रॉली व वाळू जप्त करण्यात आली. या कारवाईत २ जणांना ताब्यात घेण्यात आले असून इतर ४ जण फरार आहेत. पारनेर पोलीस ठाण्यात याप्रकरणीही गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

वरील दोन्ही गुन्ह्यांचा पुढील तपास पारनेर पोलीस करत आहेत.

## श्रीगोंदा व कर्जत तालुक्यात धुमाकूळ घालणारी चोरट्यांचा छडा

उघडकीस आणण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि हरिष भोये आणि त्यांच्या पथकाने समांतर तपास सुरू केला. दिनांक १७ ऑक्टोबर रोजी गुप्त माहितीच्या आधारे पथकाने नेवासा तालुक्यातील गिडेगाव परिसरातून मुख्य आरोपी योगेश हिवऱ्या काळे (वय २०, रा. बिटकेवाडी, ता. कर्जत) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपले फरार साथीदार एसआरप्या शिंदुश्या काळे आणि गवळीनाथ शांतीलाल काळे (रा. वाकी, ता. आष्टी, जि. बीड) यांच्या मदतीने हा गुन्हा केल्याची कबुली दिली. अधिक चौकशीत या टोळीने श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३ आणि कर्जतच्या हद्दीत २ असे एकूण ५ चोरी व घरफोडीचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले.

## जिथे स्वातंत्र्यानंतर एसटी पोहोचली नव्हती, तिथे अखेर लालपरी धावली!

राहुल निवडुंगे, भास्कर निवडुंगे, सागर निवडुंगे, संकेत निवडुंगे, शुभम निवडुंगे, सयाजी खामकर, राम भोसले, मच्छिंद्र खामकर, निर्मला खामकर, शीतल खामकर, शैला खामकर, सुनीता खामकर, कविता खामकर, समाबाई खामकर, सोपान खामकर, तुकाराम खामकर, एकनाथ निवडुंगे, बाबासाहेब रोकडे, संकल्प शिंदे, राजेंद्र रोकडे, सचिन रोकडे, सचिन खामकर, लहू भोसले, संदीप व्यवहारे, अंकुश ठाणगे, गोरख खामकर, बाळू झावरे, अक्षय ठाणगे, अशोक खामकर, आदी उपस्थित होते.

या बससेवेमुळे खामकर झाप आणि वडगाव सावताळ परिसरातील नागरिकांना पारनेरशी संपर्क साधणे अधिक सोयीचे होणार आहे. विशेषतः शाळा–महाविद्यालयांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रवासाची गैरसोय कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच बाजारपेठ, शासकीय कार्यालये आणि दैनंदिन कामांसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांनाही या सेवेचा लाभ मिळणार आहे.

ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने ही बसफेरी महत्त्वपूर्ण ठरणार असून, आमदार काशिनाथ दाते यांच्या पाठपुराव्यामुळे बससेवा सुरू झाल्याने परिसरातील ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.